Pune, Vol.: 5, 10th issue, Jan. 2025 (Monthly), Price: 100/- Pages: 42

# चिकू Piku

Fun & Learning



# प्रिय आई-बाबा

वर्षाच्या सुरुवातीलाच हालचाल, चुळबुळ, धावपळ आणि वळवळ असलेला अंक घेऊन आलो आहोत. ज्या घरात लहान मूल असतं तिथे सदैव ही चुळबुळ सुरूच असते. अशी सारखी हालचाल करण्याची मुलांना काय गरज असते त्याबद्दल 'मूलप्रश्न' मध्ये डॉ. श्रुती पानसे यांनी दिलेली माहिती नक्की वाचा. आपणही ही वळवळ स्वीकारून स्वतःसुद्धा जास्त active राहण्याचा प्रयत्न करू या. अंकातल्या वेगवेगळ्या हालचालींच्या गोष्टी, कविता वाचा आणि आवडल्या का हे नक्की सांगा. या नवीन वर्षात तुम्हाला भरपूर खेळायला, पळायला, उड्या मारायला मिळोत आणि मुलांबरोबर मुलांसारखी धमाल करायला मिळो या शुभेच्छा!

**अमृता कावणकर**
Editor, Co-Founder

**जुई चितळे**
Co-Editor




## शांत बस गं चिनू!

चित्र - शुभम लखेरा






तू पण असे उद्योग करतोस का?
अजून काय बरं खेळतोस?
आम्हाला व्हिडिओ पाठवशील?
9172136478




## 'मूल' प्रश्न

- डॉ. श्रुती पानसे

लहान मुलं सारखी हालचाल करत असतात. सतत त्यांचा काही ना काही उद्योग चालू असतो. याचं कारण मेंदूच्या विकासात दडलं आहे. डावा आणि उजवा मेंदू जोडणारा 'कॉर्पस कलोझम' नावाचा एक अवयव असतो. आयुष्यभर डाव्या आणि उजव्या भागाचा म्हणजेच शरीराचा समतोल साधणं हे याचं काम असतं. या अवयवाची मागणी असते की हालचाल करावी. लहानपणी हा अवयव योग्य तेवढी कसरत करायला लावतो, त्यातून विकसित होत राहतो. याचा आपल्याला आयुष्यभर आणि म्हातारपणीही उपयोग होतो. म्हणूनच साधारण आठ वर्षांपर्यंत मुलं एकाजागी बसत नाहीत. हालचालीमुळे हा अवयव शक्तिमान होतो जे शारीरिक तंदुरुस्तीसाठी अतिशय आवश्यक असतं. त्यामुळे मुलांना हवं तेवढं खेळण्याची, पळण्याची, हालचालींची संधी देत राहिली पाहिजे.



# धमालच धमाल

कविता - विद्याधर शुक्ल
चित्र -पूर्ती बापट

काल गंमत झाली
होती सगळी झोपली
थंडी थड थड पडली
पिंकी बाहुली शिंकली

माऊ जागी झाली
उंदरामागे पळाली
उंदीर फळीवर चढला
खाऊचा डबा पडला

काका पटकन उठले
दिवे फट फट लावले
अंगणामध्ये अंधारात
काठी घेऊन धावले



कोणीच नाही दिसले
मग झाडावरती पाहिले
माकड घाबरून हलले
काका चोर चोर ओरडले



पोलीस धावत आले
कोणीच नाही सापडले
पोलीस जाम चिडले
काकांनाच रागावले

अशी ही सारी फजिती
पिंकी बाहुलीने पाहिली
कपाळावर मारून हात
खी खी हसत सुटली...



QR कोड स्कॅन करून
हे गाणं ऐक.

जुनिअर

चिमणी चित्रं

- आभा भागवत

आरशात बघून स्वतःचं चित्र या चेहऱ्यात काढ.
डोळे, नाक, तोंड, कान, केस काढ आणि रंगव.
चित्र आम्हाला पाठव 9172136478







**दृश्य-अवकाशीय बुद्धिमत्ता**

आपलं चित्र कसं दिसू शकेल? याची कल्पना करून ते डोळ्यासमोर आणता येणं या बुद्धिमत्तेमुळे साध्य होतं.

# कापूसकोंड्याची गोष्ट!

- गार्गी पेठे | चित्र - अंबिका करंदीकर

एक होता कापूसकोंडा गुबगुबीत गोरा गोंडुला!
रोज गोष्ट ऐकली नाही तर, झोपच यायची नाही त्याला!

एकदा काय झालं–
गोष्ट सांगायला कुणीच नाही आलं!
रेशमताई–जूटदादाने तर
कट्टी –कट्टी असं चिडवलं!

इकडे दोरीआई, सूतबाबा धागा विणत बसलेत,
तिकडे रुईआजी– खादीआबा खोकत झोपलेत!

खट्टू कापूसकोंडा
विचारात पडला...
''आता काय बरं करावं!?''
हिरमुसून निघाला.



घराबाहेर पडला तसा
त्याचा चिखलात पाय गेला,
मातीत लोळून-अंगभर
मळून पुरता काळवंडला!


शिवाय त्याला बोचल्या कुंपणातल्या सुया तीन,
तरी रडला नाही पठ्ठ्या! म्हणे, ''यानं कशाला घाबरीन?''

इतक्यात त्याला दिसला
वृक्ष फुलांनी बहरलेला!
त्याच्या आड-एक सुरवंट,
कोषात जाऊन दडलेला!

तेवढ्यात एक चिमणी त्याला चोचीत घेऊन गेली,
घरट्यातल्या पिल्लांसाठी दुलई अंथरू लागली.

चोचीने टोचत चिमणी
कापसाला पिंजू लागली,
त्याचे केस नाकात जाताच
तिला जोराची शिंक आली






संधी साधत कापूसकोंडा
घरट्यातून निसटला,
झुळूक येता वाऱ्यावर
तो हलके स्वार झाला.

वाऱ्याबरोबर वाहत तो एका तळ्यापाशी आला,
डुलणाऱ्या कमळाच्या पानांवर अलगदपणे विसावला.

कमळावर होता दवबिंदू
कापूसकोंड्याला वाटली भीती!
चिंब भिजून गेलो तर,
आई-बाबा ओरडतील किती!

पण दवबिंदूंचा झाला स्पर्श आणि एक जादूच झाली!
इवलूसा कोंडोबा फुगला, त्याला कसली ढेरी आली!



ढगासारखा ढब्बू कोंडा
आकाशात उंच उडाला,
वरुन खाली बघताना
त्याला घराचा रस्ता दिसला.

घरावर आला मोठा ढग, सगळ्यांची घाबरगुंडी उडाली!
''नका घाबरू, हा तर आपला कोंडोबा!'' आजीने पुस्ती दिली!

दोरी म्हणाली, ''एवढा मोठा तू,
आता घरी कसा मावशील?''
''टेंशन नको घेऊस आई!
माझी युक्ती तू ऐकशील?''

म्हणाला,''माझी थोडी ऊब देऊ त्या झाडावरच्या चिमणीला,
थोडी त्या सुरवंटाला आणि उरलेली ठेवू आपल्याला!''



मग मोठे पुंजके कातून
त्याची छान दुलई केली,
सगळे मस्त गुरफटून झोपले
कापूसकोंड्याची गोष्ट संपली!

कापूसकोंडा कुठे कुठे फिरला,
त्याला कोण कोण भेटलं सांग बरं?

## चुलबुली डोलीवाले

अंकात मी अजून कुठे आहे ते शोध. तिथे दिलेलं गाणं म्हणत पान वर-खाली करत मी कशी हलते ते बघ.

चित्र - स्मृती मुदगल

**हाय, हॅलो, नमस्ते! माझं नाव चुलबुली डोलीवाले.**

हे पान कोपऱ्यातून पटपट वर-खाली, वर-खालीकरून गंमत बघ आणि म्हण ...

चुलबुली डोलीवाले
हाय..हॅलो..हाय
हॅलो..हाय..हॅलो करते



# मा य म रा ठी

- वैशाली कार्लेकर | चित्र - स्मृती मुदगल

उड्या मारायला, पळायला, सारखी चुळबुळ करायला मज्जा येते ना? कशाला सारखं एका जागेवर बसायचं, हो ना? तुझ्यासारखी अशीच चुळबुळ करून इथे काही अक्षरांनी जागा बदलली आहे. बघ बरं आणता येतं आहे का त्यांना धरून जागेवर? उलट-सुलट झालेले हे शब्द सरळ करून सांग किंवा लिही.

| | |
|---|---|
| ऊ खा ______ खाऊ | ट बा ली ______ |
| न पे ______ | ग जं ल ______ |
| य पा ______ | म दा ब ______ |
| न का ______ | र ना ळ ______ |

क ळ म ______

## हॅलो, मी ब्रेनी



डॉ. गार्डनर यांच्या Theory of multiple intelligences या सिद्धांतानुसार आपल्या मेंदूत आठ वेगवेगळ्या बुद्धिमता कमी-जास्त प्रमाणात असतात. त्यातल्या दोन- तीन बुद्धिमत्ता ठळक असतात. पहिल्या काही वर्षांमध्ये मुलांचा मेंदू एखाद्या स्पंजसारखा असतो; त्याला जे मिळेल ते तो शोषून घेतो. चिकूपिकूच्या अंकांमधून या आठ बुद्धिमत्तांचे सहज, सोपे अनुभव मुलांना मिळावेत यासाठी आम्ही प्रयत्न करतो.

# झाडांची चुळबुळ

गोष्ट - केतकी घाटे | चित्र - मैत्रेयी निलावार नामजोशी



मी उडी मारतो, पळतो, कोलांटी उडी मारतो. झाडं एकाच जागी उभी असतात. ती हालचाल करतच नाहीत का? अंतूला प्रश्न पडला.

हो. आम्हीपण हालचाल करतो. खाऊ दिसला की तुझी मान कशी आपोआप वळते. तसा आमचा खाऊ म्हणजे सूर्यप्रकाश.

आम्ही पण सूर्याच्या दिशेने मान वळवतो. तू बघ. खिडकीत ठेवलेलं रोप सूर्यप्रकाशाच्या दिशेने पळतं.





मी लाजाळू. मला कोणी हात लावला की मी पानं मिटते. थोड्या वेळाने परत उघडते. तू मला पाहिलं आहेस का? इंग्रजीत मला म्हणतात Shameplant किंवा Touch me not



आम्ही वेली अशा स्प्रिंग्स तयार करतो. त्यांना टेण्ड्रील असं म्हणतात. आम्ही नाजूक-साजूक आहोत. या स्प्रिंग्जने आम्ही झाडाच्या फांदीचा किंवा एखाद्या कुंपणाचा हात धरतो. त्याचा आधार घेत सगळीकडे पसरतो.



मला ओळखलंस? मी दूर्वा. मी एक गवत आहे. मी जमिनीवर रांगत रांगत पसरते. म्हणजे माझी एक फांदी आडवी होते. जराशी पुढे उडी मारते. मुळं मातीत सोडते आणि पानं तयार करते. असं रांगत रांगत आम्ही सगळीकडे पसरतो.

''मला का नाही दिसत तुमची ही हालचाल?''

''आम्ही अगदी हळू हळू हलतो. त्यामुळे तुला दिसत नाही.''
तू गंमत म्हणून एक प्रयोग करून बघ. कुंडीतलं रोप किंवा गवत किती सेंटिमीटर वाढलं ते रोज मोजून लिही. म्हणजे त्याच्या हालचालीचा वेग कळेल.

# चिकू Piku

गोष्ट - अमृता कावणकर | चित्र - भक्ती दलाल



एकदा चिकू निवांत लोळत होता. त्याला डुलकी लागणार तितक्यात आवाज आला. चुचु.. चुचु.. चुचु.. त्याने आवाजाच्या दिशेने मान फिरवली. काहीतरी पळताना दिसलं. ''काय होतं ते?'' तितक्यात ते तुरुतुरु चालत कपाटामागे लपलं. चिकूने हळूच वाकून बघितलं. ''उंदीर आहे बहुतेक. ठुल्लू मांजरीला बोलवायला हवं.'' चिकूने खिडकीतून पिकूला हाक मारली, ''पिकू, ताबडतोब ठुल्लूला घेऊन ये. घरात उंदीर शिरलाय. मी लक्ष ठेवतो त्याच्यावर.'' पिकू उडत गेली आणि तिने ठुल्लूला निरोप दिला. ''उंदीर? त्याला तर मी फटक्यात पकडीन. चल...'' ठुल्लू उत्साहात म्हणाली. ठुल्लू आणि पिकू घरी पोचल्या.

''कुठंय उंदीर?'' ठुल्लूने विचारलं. ''कित्ती वळवळा आहे हा उंदीर! पाच मिनिटात पाचशे वेळा इकडून तिकडे गेला... आता पलंगाखाली आहे.'' ''थांब.. मी आलीये ना. आता नो टेन्शन. एका मिनिटात पकडते त्याला.'' ठुल्लूने पुढचे पाय वाकवले. शेपूट ताठ केलं. ''फक्त बाहेर येऊ दे त्याला!'' तितक्यात पुन्हा चुचु.. आवाज आला. ''येतोय... येतोय...'' पिकू म्हणाली.



ठुल्लू तयारच होती. ती उडी मारणार तितक्यात त्या उंदराने घाणेरडा वास सोडला. ठुल्लूने मागे उडी मारली. ''याक. कसला घाणेरडा वास सोडलाय यानं! वास सोडणारा उंदीर मी पहिल्यांदाच बघतीये.'' तो प्राणी कपाटाच्या मागून आला आणि म्हणाला.

''चुचु.. चुचु.. उंदीर उंदीर काय लावलंय? दिसत नाही का? मी उंदीर नाही, चिचुंद्री आहे.''

''चिचुंद्री??? पण तू तर उंदरासारखीच दिसतेस!'' ठुल्लू म्हणाली.

''नीट बघा. माझं नाक छोटया सोंडेसारखं आहे. उंदराचं नाक असं असतं का? उंदीर शाकाहारी आहे. पण मी मांसाहारी आहे – नॉन व्हेजिटेरियन. हे बघा... मला सुळे आहेत. उंदराला ते नसतात.'' दात दाखवत चिचुंद्री म्हणाली.

''उंदीर नसलीस तरी त्याच्यासारखीच तू नासधुशी. कपडे कुरतडणार. धान्य खाणार. नको नको करणार. तू घरातून बाहेर हो बाई.'' चिकू म्हणाला.

''का? हे माझंपण घर आहे. माझ्या आजीपासून आम्ही इथे आणि बाजूच्या शेतात राहतोय. आणि मी माणसाची शत्रू नाही मैत्रीणच आहे... घरातली झुरळं, किडे, कीटक खाऊन मी घर स्वच्छ ठेवते. उंदरांची, बेडकांची छोटी पिल्लंसुद्धा मी खाते.
शिवाय शेतामधले कीटक खाते.
म्हणूनच माणसं आम्हाला लक्ष्मीचं रूप मानतात.''



''चिचुंद्रीताई, तू तर या घराचं रक्षणच करतेस. बरोबर आहे हे घर तुझंही आहे. सॉरी... तुला मी नासधुशी म्हटलं.''



''ठीक आहे रे. बरेचजण मला उंदीर समजतात. चला... आता मी निघते. पोट गुडगुडतंय. आम्ही एका जागी बसूच शकत नाही. इथून तिथे तिथून इथे. त्यामुळं सारखी भूक लागते. काय सांगू... आमच्या वजनाच्या १० पट खाऊ आम्हाला खायला लागतो. झोपतो तेव्हाच फक्त तोंड बंद, नाहीतर चालूच... साप, मुंगूस, मांजरी कोणीच आमच्या मागे येत नाहीत. त्यांनी तसं केलं तर मी...''

''तर तू घाण वास सोडतेस. नको गं बाई. पुन्हा तो वास नको सोडूस.'' नाक झाकत ठुल्लू म्हणाली.

''ती माझी युक्ती आहे. डिफेन्स मेकॅनिझम.'' चुचु.. हसत चिचुंद्री म्हणाली. सगळ्यांनी चिचुंद्रीला टाटा केला. चुचु.. करत चिचुंद्री शिकारीला निघाली.



माझ्या पिल्लांना मी असं घेऊन जाते. झुपकन कडेने जाताना काही प्राण्यांना आम्ही सापासारखे दिसतो. आणि ते घाबरतात.





माझ्या अंगातून येणाऱ्या वासामुळे कुठलाच, प्राणी माझ्या वाटेला जात नाही. फक्त घुबडापासून मला सावध राहावं लागतं. कारण घुबडभाऊला वासच येत नाही.



# लगबग धावपळ

कविता - जुई चितळे | चित्र - श्रीनिवास बाळकृष्ण

आईची तळमळ तळमळ
''अरे देवा, मिक्सर बिघडला.''
बाबांची खटपट खटपट
''मी दुरुस्त करतो.''

दादाची लगबग लगबग
''मी मदत करतो.''
मिनूची लुडबुड लुडबुड
''मी पण मदत करते.''

आईची चुळबुळ चुळबुळ
''उशीर होतोय स्वयंपाकाला.''
.बाबांची तगमग तगमग
''काही केल्या सुरू होत नाहीये,''

मिनूची धडपड धडपड
''मी स्क्रू ड्राइव्हर फिरवते.''
दादाची तडतड तडतड
''मध्ये मध्ये करू नकोस गं.''


आईची गडबड गडबड
''द्या इकडे, मीच बघते.''
सगळ्यांची मिळून
चळवळ चळवळ

अचानक सुरु झाली
मिक्सरच्या मोटारची
घरघर घरघर
मिक्सरच्या पोटात
खळबळ खळबळ



चटणी फुर्रकन
उडाली घरभर
सगळ्यांची झाली
धावपळ धावपळ


हा QR स्कॅन
करून गाणं
नक्की ऐक.



# कणभर तीळ

कविता - लीलावती भागवत | चित्र - ओंकार मरकळे

वाटाणा, फुटाणा, शेंगदाणा, उडत चालले टणाटणा
वाटेत भेटला तिळाचा कण, हसायला लागले तिघेही जण



तीळ चालला भरभर, थांबत नाही कुठे पळभर
''तिळा रे तिळा, कसली रे गडबड?''
''थांबायला वेळ नाही, सांगायला वेळ नाही
काम आहे मोठं, मला नाही सवड!''

''ऐक तर जरा, पाहा तर खरा
कणभर तिळाचा मणभर नखरा!''



''बघा तर थाट, सोडा माझी वाट
बघू या गंमत, करू या जंमत
चला रे जाऊ याच्याबरोबर''

पण तीळ पाहा कसा! हाय नाही हुय नाही, हासे फसाफसा
पाकाने खुलतोय, काट्याने फुलतोय

''अरे पण हे काय? तीळ कुठे गेला?
काटेरी पांढरा हलवा कुठून आला?''
''वाटाण्या, फुटाण्या, शेंगदाण्या पाहिलीत गंमत?
कणभर तिळाची मणभर करामत!



एवढासा म्हणून हसलात मला,
खुलवीन मी तर सर्व जगाला!''

हा QR स्कॅन
करून गाणं
नक्की ऐक.

साभार - बालभारती

# Wiggly Wobbly Dantu

Story - Nivedita neelam | Illustrator - Charitra Wagal

One of Abha’s teeth, Dantu, woke up with a jolt. For more than 6 years he had never moved even once! And now suddenly, he realised he was able to MOVE! Dantu was surprised! Just then he heard Abha shout, Aaaaiiiiiiiiiiiiiiiiiiiii Aaiiiiiiiiiiiii! My tooth is moving! See See See!

Abha’s finger started shaking Dantu. Woahhhhh! This can’t be good, he thought… Aai peered into her mouth. Was she looking for Bramhand? Dantu wondered. He overheard Aai telling Abha, “Leave the tooth alone, Don’t touch it…” But… touching Dantu was all Abha did! Abha loved showing off wobbly little Dantu to everyone – Aai, Baba, Aaji, Ajoba, Mama, Mami, her friends, her teachers, and even the society’s Security Kaka knew about Dantu.



“Wow! I am FAMOUS!”, Dantu thought to himself.

"Dantu was being given special treatment!" the other teeth complained.

When Abha gargled in the morning, he enjoyed being swayed back and forth by the cool water. Dantu twitched every time, Cheeky, the tongue tickled him! Dantu had now gotten used to this new experience. When hungry little Abha was gobbling up her paratha, Dantu shook so much that he thought Abha might swallow him whole!


During the fruit break at school, Abha bit into her sweet, juicy apple. CRUNCH! Hmmm... That sounded different Abha thought. Something in her mouth didn't feel right. She spit out the piece of apple and her eyes widened with surprise. Along with the apple, was one more thing...

It was Dantu! It took him a moment to realise, he was all on his own, away from his teeth friends, away from Cheeky. What was happening? The next thing he knew, Dantu was in a Tulsi pot in Abha's garden. Surrounded by soft, sweet-smelling soil. Dantu felt relaxed. "Aai, what's going to happen now?" asked Abha with a bright smile. Cheeky, the tongue was waving at Dantu from a tiny window in Abha's mouth.



# खेळ खेळू या

- दीप्ती देशपांडे | चित्र - ओंकार बागवे



## बाणाचे चमचे

फरशीवर असे १० बाण काढ. प्रत्येकाने १० चमचे घ्यायचे. चमच्याचे गोल बरोबर बाणाच्या दिशेने येतील असे चमचे पटपट मांडायचे. ज्याचं आधी मांडून होईल तो जिंकला.



## लोळालोळी

फरशीवर गोल आखून त्यात काही वस्तू ठेवायच्या. वस्तूंचे दोन सारखे गोल करायचे. समोर काही अंतरावर दोन रिकामे गोल  काढायचे. आता वस्तूंच्या गोलापाशी प्रत्येकाने झोपायचं. Start म्हटल्यावर एक वस्तू घेऊन लोळत रिकाम्या गोलापर्यंत जाऊन, तिथे ती ठेवायची. सगळ्यात आधी जो वस्तू पोचवेल तो जिंकला.




## डावा, उजवा

फरशीवर गोल काढून प्रत्येकाने गोलात उभं राहायचं. एकाने डावा-उजवा, उजवा-डावा सूचना द्यायच्या. त्याप्रमाणे खेळाडूंनी उजवीकडच्या/डावीकडच्या गोलात उडी मारायची. वेग वाढला की चुकामूक होऊन मजा येते.



**शरीर स्नायू विषयक  बुद्धिमत्ता**

या बुद्धिमत्तेमुळे शरीरातील स्नायूंचा नियंत्रित वापर करायला आपण शिकतो.  खेळांमधून मुलांच्या या बुद्धिमत्तेला चालना मिळू शकेल.



# उंदीर आणि मांजर

चित्र - हबीब अली

छोटे उंदीर, मोठे उंदीर
जाडे उंदीर, रोडे उंदीर
उंच उंदीर, बुटके उंदीर
कपाटात मांजर, तिची नाही नजर
चार उड्या धप्पकन...

लांब शेपटीचे, आखूड शेपटीचे उंदीर
टी शर्ट घालणारे उंदीर, फ्रॉक घालणारे उंदीर
हसणारे उंदीर, रडणारे उंदीर
कपाटात मांजर, तिची आहे नजर...

साभार - वासंती ताई, गरवारे बालभवन

- अजून कसे कसे उंदीर असतील? तुला गाणं वाढवता आलं तर आम्हाला पाठव. 9172136478
- शेजारच्या पानावरचं हे गाणं म्हणत हा खेळ खेळून बघ. एक मूल मांजर होईल आणि बाकीचे सगळे उंदीर. आणि मग वरचं गाणं म्हणायचं. कपाटात मांजर, तिची आहे नजर... म्हटल्याबरोबर, मांजर पळायला लागेल आणि एका उंदराला आऊट करेल. मग त्याने राज्य घ्यायचं. पुन्हा गाणं सुरू...




- या दोन्ही पानांवर मिळून किती उंदीर आहेत बरं?



- या शेजारच्या चित्रात उंदरांमध्ये अजून चार कोण वेगळे प्राणी/कीटक आहेत? शोध बरं

उंदराला खाऊपर्यंत पोचव





सरसर साप वाघे-वापं

**सापाच्या अंगावरची नक्षी गिरवून त्याला मस्त रंगव.**



# जादूगार आणि राजकन्या

गोष्ट - हृषीकेश पाळंदे | चित्र - शुभम लखेरा


खूप दूर, एका सफेद पर्वतावर एक छोटंसं राज्य होतं. किलबिलान नावाचं. त्या राज्याची राजकन्या होती सोनसळी. ती तिच्या आईबरोबर म्हणजे महाराणीबरोबर राजमहालात राहायची. या सफेद पर्वताच्या बरोबर समोर अजून एक पर्वत होता. तिथे एक जादूगार राहायचा. त्याचं नाव रुस्कान.

रुस्कानने त्या पर्वतावर एक झोपडी बांधली होती. तिथे तो जादूचे प्रयोग करायचा. त्याच्या झोपडीतून रात्रंदिवस रंगीत धूर बाहेर पडताना दिसायचा. सोनसळी खिडकीतून रोज ते बघायची. कधी कधी धुरांसोबतही काही गोष्टी उडत यायच्या. एकदा एक रंगीबेरंगी पीस उडत आलं. ते सोनसळीच्या मांडीत येऊन बसलं. झालं, मग काय सोनसळी खूश. ते तिनं तिच्या केसात खुपसून ठेवलं. रोज ते पीस ती केसात घालायची. एके दिवशी सोनसळीला रंगीत धूर दिसलाच नाही. असे तीन दिवस गेले. ती बेचैन झाली. ''मीच जाऊन बघते'' तिने ठरवलं. कोणाचंही लक्ष नसताना सोनसळी निघाली.

सफेद पर्वत उतरून ती पायथ्याशी आली. पण जादूगाराची झोपडी अजून खूप लांब होती. ''कशी पोचणार मी इतक्या वर?'' तितक्यात तिच्या केसातलं पीस उडत समोर आलं. ''अरे असं कसं तरंगतंय हे पीस?'' ती त्याला धरायला गेली तसं ते सुळकन पुढे गेलं. पीस पुढे पुढे पळायला लागलं. सोनसळी त्याच्या मागे धावत होती. मध्येच ते झाडाच्या फांदीवर जायचं. सोनसळी झाडावर चढायची. मग तिथून पीस खाली गवतावर लोळायचं. सोनसळी तसंच करायची. असं करत करत ती कधी झोपडीपाशी पोचली तिला समजलंच नाही. ''किती सुंदर आहे जादूगाराची झोपडी! फुलांनी, वेलींनी झाकलेली.'' तितक्यात झोपडीतून रंगीत धूर पुन्हा यायला लागला. ''पण या झोपडीचं दार कुठंय?'' सोनसळी झोपडीभोवती फिर फिर फिरली. पण तिला आत जायचा रस्ता सापडेनाच. वैतागून ती एका दगडावर बसली.

तेवढ्यात पिसाने पुन्हा उसळी घेतली. ते सोनसळीला गुदगुल्या करायला लागलं. ''खी खी खी. अरे थांब. नाहीतर तुझं नावच सांगते आईला.'' पण पीस काही ऐकेना. ते परत धावायला लागलं आणि सोनसळी त्याच्या मागे धावली. पिसाने सोनसळीला दूरच्या निळ्या फुलांच्या रानात आणलं. हे रान खूपच वेगळं होतं. हिरवंगार नाही. निळंशार. हळूहळू काळोख झाला.

इकडे राजकुमारी कुठेच सापडेना. राजवाड्यात, गावात सगळीकडे शोधलं तरी ती सापडेना. महाराणी घाबरली. शेवटी तिने दवंडी पिटवली–



''जो कोणी राजकन्येला शोधून देईल त्याला मोठं बक्षीस मिळेल.''

जादूगार रुस्कानला जादूसाठी काही गोष्टी लागायच्या. जसं की गोल छोटे दगड, पानंफुलं, उंदीर–ससे, साप, हाडं वगैरे. काही वस्तू आणण्यासाठी तो गावात आला होता. तेव्हा त्याने दवंडी ऐकली आणि तो राजवाड्यात गेला. महाराणी म्हणाली, ''जादूगारा, बरं झालं तू आलास. राजकुमारीला तूच शोधून काढ.''

''प्रयत्न करतो. मला सांगा, राजकुमारीने काय काय घातलं होतं?''
''निळा झगा, हातात बांगड्या, आणि केसात एक वेगळंच रंगीबेरंगी फूल होतं.''
हे ऐकताच जादूगाराचा चेहरा खुलला. तो महाराणीला म्हणाला,
''ते फूल नाही पीस आहे. आता काळजी नका करू.''

मग जादूगार रुस्कानने विस्तव पेटवला. त्यात नुकतीच खुडून आणलेली पानं घातली. आणि प्रार्थना केली. थोड्याच वेळात एक मोठी, रंगीबेरंगी पक्षिण तिथे आली. ''राजकन्या हरवली आहे. तिच्या डोक्यात तुझं पीस आहे. तू तिला शोध आणि इकडे घेऊन ये.''





ती पक्षिण लगेच उडत निघाली. पिसाचा माग काढत ती त्या निळ्या फुलांच्या रानात पोचली. तेव्हा तिला झाडाखाली गाढ झोपलेली सोनसळी दिसली.

पक्षिणीने तिला अलगद उचलून जादूगाराकडे आणलं.

जादूगाराने तिच्या डोक्यातलं पीस काढून तिच्या गालावर टेकवताच ती जागी झाली. महाराणीला अतिशय आनंद झाला. तिने सोनसळीच्या भरपूर पाप्या घेतल्या. महाराणी म्हणाली, ''तू माझ्या लेकीला घेऊन आलास. तुला हवं ते बक्षीस माग!''

''वायव्येला निळा पर्वत आहे.. तिथे जे निळ्या फुलांचं रान आहे, ते मला हवंय!''

महाराणी तयार झाली. रुस्कानला निळ्या फुलांचं रान मिळालं. सोनसळी त्याला म्हणाली, ''जादूगारा, तुझ्या झोपडीला दार नाहीये का? मला तुझ्या झोपडीत नेशील ना एकदा?''

''बघू या. तोपर्यंत हे जादूचं पीस तुझ्याजवळच ठेव.'' रुस्कान हसला आणि निळ्या फुलांच्या रानात निघाला. तिथे आता तो नवे जादूचे प्रयोग करणार होता.



**भाषिक - वाचिक बुद्धिमत्ता**

गोष्टींमधून मुलं नवे शब्द शिकतात. सहज वापरतात. १ ते ८ मधल्या मुलांचा भाषा शिकण्याचा वेग जास्त असतो.

## Science सैर

- शिवानी पेठे



### थरथरणारी काडेपेटी



काडेपेटीच्या कव्हरला दोन बाजूंनी एक एक पेपर क्लिप्स लावून घे. त्यातून दोरा ओवून घे. दोऱ्याची दोन्ही टोकं धरून दोरा ताठ कर. काडेपेटी वरच्या बाजूला आण. काडेपेटीच्या आतलं खोकं थोडंसं बाहेर काढ आणि दोरा ताठ धर. काडेपेटी थरथरत खाली येईल.

### सळसळणारा साप

एक पातळ तार पेन्सिल किंवा पेनावर गुंडाळ. तारेची स्प्रिंग तयार झाली की पेन्सिलीवरून काढून घे. आता स्प्रिंग दोन्ही बाजूंनी ताणून लांब कर. रंगीत स्ट्रॉचे छोटे तुकडे कापून घे आणि स्प्रिंगमध्ये घाल. तुकडे खाली पडू नयेत म्हणून स्प्रिंगच्या दोन्ही बाजूला वळवून घे. स्प्रिंग सरळ उभी धरल्यावर स्ट्रॉचे तुकडे सळसळणाऱ्या सापासारखे खाली येतील.

### पळणारे कण



एका पांढऱ्या प्लेटमध्ये थोडं पाणी ओत. त्यावर मिरपूड पसरून टाक. आता तुझं बोट थोड्या लिक्विड सोपमध्ये बुडवून प्लेटच्या मधोमध टेकव. मिरपुडीचे कण बोटापासून दूर पळून जातील.




**व्हिडिओ बघून सगळे प्रयोग नक्की करून बघ.**

### फेसाचा साप



प्लॅस्टिकची बाटली घेऊन ती अशी कापून घे, टर्कीशचा  नॅपकिन बाटलीच्या कापलेल्या टोकावर ठेवून त्याला रबरबँड लाव. एका वाटीत थोडं हॅन्ड वॉश/लिक्विड सोप घे त्यात थोडं पाणी घाल. थोडं लिक्विड सोप टर्कीश कापडाच्या सपाट भागावरसुद्धा लाव. आता बाटली लिक्विड सोपमध्ये बुडव आणि बाटलीच्या तोंडातून जोरात फुंकर मार. किती मोठा साप तयार करता येतोय बघ.




पान कोपऱ्यातून वर-खाली खाली-वर करून गंमत बघ





# माऊ आणि बाऊ

गोष्ट - संहिता सहस्रबुद्धे | चित्र - ओंकार बागवे

बाऊला फारच मज्जा येत होती!
तो घसरगुंडी खेळत होता. कुठे माहितीये?
माऊच्या नाकाच्या आत.

माऊला झाली होती सर्दी. नाक शेंबडाने भरलं होतं. माऊच्या सर्दीत लपला होता बाऊ. तो शेंबडाबरोबर हळू हळू नाकाच्या टोकाला यायचा आणि मग सुईईईई... माऊने श्वास जोरात वर ओढला की एकदम वर जायचा. त्याला मज्जा येत होती.

आई म्हणाली, ''माऊ, नाक शिंकरून ये.म्हणजे नाक मोकळं होईल. ये मी साफ करू का?''

''उं हू'' आईकडे न बघताच माऊ म्हणाली. माऊला आजिबात नाक शिंकरायचं नव्हतं.



बाऊची तर चंगळच होती. तो म्हणाला ''येस! बरं झालं माऊ नाक शिंकरत नाहीये. अजून सर्दी वाढेल. आणि मला अजून जोरजोरात खेळता येईल. मग मी तुफान वेगाने सगळीकडे पसरेन. सगळ्यांच्या नाकात जाऊन घसरगुंडी खेळेन. हे हे हे हे''





तेवढ्यात साहिलदादा आला.
तो माऊकडे बघून म्हणाला,
''अशी का शेंबडी होऊन बसली आहेस? नाकातला शेंबूड साफ केला नाही तर श्वास नीट घेता नाही. मग आपल्याला दम लागतो.
आज खाली पकडापकडी खेळायची आहे ना? तू तर काही नाक साफ करत नाहीस. त्यामुळे तू दमणार आणि लवकर आऊट होणार. आणि तुला माहितीये? शेंबूड काढून टाकला नाही की तो घट्ट होतो. कधी हत्ती, कधी घोडे असे वेगवेगळे आकार घेतो! मग तर काढायला अजून त्रास होतो.'' ''साहिलदादा, तू थांब. मी लग्गेच नाक शिंकरून येते.'' माऊ म्हणाली.
माऊने नाक शिंकरलं. फुर्रकन शेंबूड बाहेर आला आणि त्याबरोबर बाऊसुद्धा बाहेर निघाला.
माऊने मोठा श्वास घेतला. ''बरं वाटतंय... नाक मोकळं झालं!'' माऊ म्हणाली.

''मग... आता नाक भरलं की...''

''लगेच शिंकरून यायचं!''

''बरोबर! शहाणी आहे आमची माऊ! चल आता खेळू या.'' साहिलदादा म्हणाला.






माऊ लागली हसायला..
आणि बाऊ लागला रडायला!''


गोष्ट - जुई चितळे | चित्र - ओंकार महामुनी




माझ्या जवळ थांबा सगळे. मी धरून ठेवतो म्हणजे काही नाही होणार.
पण आज समुद्राला झालंय तरी काय? आपण खाली राहतो तिथे तर काही पाणी एवढं हलत-डुलत नाही.
या लाटा आहेत. पाण्याच्या वर हवा आहे ना? ती कधीकधी जोरात वाहायला लागते. याला वारा म्हणतात. वाऱ्यात एवढा जोर असतो की वाटेत येईल त्यांना तो ढकलतो. वाऱ्यामुळे समुद्राचं वरचं पाणी असं पुढे-मागे आणि वर-खाली होत असतं. वाऱ्याचा जोर जेवढा जास्त, तेवढया मोठया लाटा !!
बापरे! बरं झालं आपण पाण्याच्या वर राहत नाही. वाऱ्यामुळे सारखे हालत राहू आणि दमून जाऊ.
पण मला एक आयडिया सुचली आहे. वाऱ्याच्या वाटेत जे काही येईल त्याला तो ढकलतो ना? मग एक गंमत करू या. आजीने विणलेला समुद्री गवताचा पडदा आणि काठी घेऊन येऊ. बघा आता गंमत!




**ठिपके जोडून कोणतं  चित्र तयार होतंय ते बघ आणि ते रंगव**






हा तुझा चेहरा आहे असं वाटण्यासाठी हवे तसे बदल कर. केस वाढव.
तुझ्या स्वभावाचे रंग कोणते आहेत ते ठरव. ते रंग वापरून चित्र रंगवून पूर्ण कर.



सिनियर
चिमणी चित्रं

पालकांसाठी - स्वत:चं चित्र काढणं हा स्वत:वर प्रेम करण्याचा एक सुंदर मार्ग आहे.

- आभा भागवत




रद्दी कागद रंगवून, त्याचे तुकडे फाडून ढप्पू सरड्यावर चिकटव आणि मसूर, उडीद डाळ चिकटवून ढिल्लो मधमाशीला सजव. बाकीचं चित्र रंगवून आम्हाला नक्की पाठव. 9172136478

हातांची जादू

# वळवळणारा मासा

- स्मृती मुदगल



1. दिलेल्या चित्रातले आकार छान रंगव व कात्रीच्या मदतीने कापून घे.



2. चौकोनी भाग घे आणि चित्रात दाखवल्याप्रमाणे टोकाला टोक जुळवून मधोमध घडी घाल. चौकोन उघड आणि मधल्या रेषेपर्यंत दोन्ही बाजू दुमडून घे.




3. आता पुन्हा चौकोन उघड आणि पहिल्यांदा घातली होती तशी मधोमध घडी घाल. माशाच्या डोळ्यांजवळ दिलेली तुटक रेष आणि अंगावरच्या रेषा कापून घे.




4. आता चित्रात दाखवल्याप्रमाणे एका बाजूला फेव्हिकॉल लावून घे आणि दुसरी बाजू त्यावर चिकटव.

5. आता माशाचे पर, शेपूट आणि गोल तोंड चिकटवून घे. वळवळणार मासा झाला तयार!

वळवळणारा मासा कसा तयार करायचा त्याचा व्हिडिओसुद्धा दिला आहे.



**मुखपृष्ठ : भक्ती दलाल**
**आतील मांडणी :** OneZeroEight Brandcomm Pvt Ltd.
**मुद्रितशोधन :** वैशाली कार्लेकर, जुई चितळे

Editor : Amruta Kawankar

**Language: Marathi, English**

**Published by :**
**Amruta Govind Kabade,**
**OneZeroEight Learning Pvt Ltd.**
Flat No. 10, Narayan Complex,
2nd Floor, Hingne Kh.,
Sinhagad Road, Pune 411 051

**Place of Publication :**
Flat No. 10, Narayan Complex, 2nd Floor,
Hingne Kh., Sinhagad Road, Pune 411 051

**Printed by : Atharva Print Creation**
S. No. 91/1, Plot No. 8,
Tulshibaugwale Colony,
Sahakarnagar, Pune 411 009

**For subscription:**
Visit www.chikupiku.com Or
call on 9172136478

# धांगड धिंगा धांगड धिंगा...

कविता - शांता शेळके | चित्र - भक्ती दलाल

आज करू या नुस्ता दंगा,
धांगड धिंगा धांगड धिंगा

उडू बागडू, नाचू खेळू,
गादीवरती मजेत लोळू

घरभर आपण घालू पिंगा,
धांगड धिंगा धांगड धिंगा!

वेण्या उडवित धावे ताई,
रिबिन सुटूनी गळ्यात येई,

फुगडी, झिम्मा आला रंगा,
धांगड धिंगा धांगड धिंगा!!

पाय घसरूनी बाळू पडला,
श्याम पायरीवर तडमडला

तरी न होती जखमा अंगा,
धांगड धिंगा धांगड धिंगा!!

धडधड आम्ही लावू दारे,
किंचाळत कधी गाऊ सारे

सुट्टी आज आईला सांगा,
धांगड धिंगा धांगड धिंगा!!!





RNI TC NO: MAHBIL/2019/78568,
Declaration No: SDM/Haveli/SR/59/2019,
Date of Publication: 01/01/2025